


# मुले भेटली क्रिकेटपटूंना

**पुणे :** गल्फ लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अपंग कल्याण शिक्षण संस्थेतील विशेष मुलांसाठी आयपीएल स्पर्धेतील रायझिंग पुणे सुपरजायंटच्या खेळाडूंबरोबर गप्पांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या वेळी स्टीव्हन स्मिथ, फाफ डुप्लेसिस आणि जयदेव उनाडकट हे खेळाडू उपस्थित होते. मुलांच्या जिद्दीला, त्यांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या संचालक आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, 'आमच्या संपूर्ण प्रकल्पात, खेळांनीच मुले सबळ होऊ शकतात हे आम्ही पाहात आलोय. त्यातून चांगले बदलही अनुभवले आहेत. आम्ही दीर्घ काळापासून अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थेबरोबर काम करीत आहोत. काहीही शक्य नाही, हा विश्वास आम्हाला मुलांमध्ये निर्माण करायचा आहे.' आपल्या आवडत्या क्रिकेटपटूला भेटणार म्हणून मुलांमध्ये उत्साह बघायला मिळाला, असे सांगून गल्फ ऑइल लुब्रिकंट्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक रवी चावला यांनी उपक्रमाचे कौतुक केले.